आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
बुधवार, दिनांक २६ जून २०२४

<u>ठळक बातम्या</u>

1. 'सहमती आणि विरोध हे लोकशाहीचं वैशिष्ट्य असून विरोधकांनी त्यांची भूमिका सदनात प्रबळपणे मांडावी'- लोकसभा सभापती ओम बिर्ला यांचं प्रतिपादन.

2. महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून होणार सुरु, पूर्वसंध्येच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार.

3. राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त ‘सामाजिक न्याय दिन’ सर्वत्र साजरा.

4. हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, "स्वच्छ, सुंदर बसस्थानक" अभियानांतर्गत 'ब' वर्गामध्ये भंडारा जिल्ह्यातील साकोली बसस्थानकाचा राज्यात पहिला क्रमांक.

*****

<u>ओम प्रकाश बिर्ला</u>

अठराव्या लोकसभेचे अध्यक्ष म्हणून ओम बिर्ला यांची आज आवाजी मतदानाने निवड करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांना अध्यक्षांच्या आसनापर्यंत नेले. उभय नेत्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. लोकसभापती निष्पक्ष होवून सभागृहाचं कामकाज पाहतील असा विश्वास यावेळी राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी व्यक्त केला. तर लोकसभेत छोट्या पक्षांना लोकांचे प्रश्न मांडण्याची बरोबरीची संधी मिळायला हवी अशी भूमिका AIMIM पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवेसी, आणि आझाद समाज पक्षाचे खासदार चंद्रशेखर यांनी मांडली. दरम्यान, दुसऱ्यांदा लोकसभा सभापती म्हणून सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल सभापती ओम बिर्ला यांनी पंतप्रधान आणि इतर सर्व पक्षाचे आभार मानले. १८व्या लोकसभेच्या उत्सवात ऊन पावसाची चिंता न करता ६४ कोटींपेक्षा अधिक मतदारांनीही भाग घेतला आणि निवडणूक आयोगाने निष्पक्षपणे त्यांची जबाबदारी पार पाडल्याबद्दल बिर्ला यांनी देशातील जनतेचे आणि निवडणूक आयोगाचे आभार मानले. १८ व्या लोकसभेत २८१ सदस्य पहिल्यांदाच निवडून आले आहेत. त्यांचं अभिनंदन करून त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव त्यांनी करून दिली. यावेळी बोलतांना 'सहमती आणि विरोध हे लोकशाहीचं वैशिष्ट्य असून विरोधकांनी त्यांची भूमिका सदनात प्रबळपणे मांडावी आणि सरकारनं देखील त्यांच्या सूचना ऐकून घ्याव्या' अशी अपेक्षा बिर्ला यांनी व्यक्त केली. संसदेची गरिमा टिकविण्याची जबाबदारी हि सामूहिक असून मी सभापतींपदाच्या मर्यादेत राहून सर्वांना त्यांची मत समान पद्धतीने ठेवता येतील यासाठी प्रयत्न करेन असा विश्वास यावेळी सभापती ओम बिर्ला यांनी व्यक्त केला. सभापतींच्या भाषणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मंत्रिमंडळाची ओळख सभागृहाला करून दिली.

## पदवीधर/विधानपरिषद मतदान

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांसाठी आज मतदान होत आहे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान चालणार असून, मतमोजणी एक जुलै रोजी होणार आहे.

## पावसाळी अधिवेशन/चहापान बहिष्कार

महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. हे अधिवेशन १२ जुलैपर्यंत चालेल. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये मांडण्यात येईल. दरम्यान, विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारनं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे. हे सरकार शेतकरी विरोधी आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आपल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्रात आवाज उठवत नसल्याचा आरोप करीत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची बैठक आज मुंबईत पार पडली. बैठकीला काँग्रेस विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अंबादास दानवे, शेकापचे जयंत पाटील, सपाचे अबू आझमी आदी नेते उपस्थित होते. बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले कि नैसर्गिक आपत्तीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठीचे प्रस्ताव केंद्राला पाठवण्यात राज्य सरकारने विलंब केल्यामुळे त्यांना मदत मिळाली नाही. अतिवृष्टी, गारपीट, ओला दुष्काळ याबातचे प्रस्ताव पाठवायला उशीर झाला म्हणून केंद्राकडून पैसे आले नाहीत असा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी आणि वीज बिल माफी करावी अशी मागणी या अधिवेशनात आपण करणार असल्याच ही वडेट्टीवार म्हणाले.

## नीट परीक्षा-दानवे

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट परीक्षा घोटाळा प्रकरणी केंद्रीय तपासणी पथकानं बीड इथं काही जणांची चौकशी केल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये माजलगाव तालुक्यातल्या काही शिक्षकांचा समावेश असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. दरम्यान नीट परिक्षेप्रकरणी राज्यात काही जणांना अटक झाली आहे. इतर परीक्षेतही आणि भरती प्रक्रियेत गैरप्रकार सुरू आहे असा आरोप विरोधी पक्षनेते दानवे यांनी केला. विद्यमान सरकार बेजबाबदार असल्याची टीकाही त्यांनी केली.

## निरोप समारंभ

महाराष्ट्र विधानपरिषदेतील २१ जून रोजी पाच सदस्य निवृत्त झाले आहेत. निवृत्त झालेल्या सदस्यांचा निरोप समारंभ उद्या दुपारी ३ वाजता विधिमंडळातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.विधानपरिषद सदस्य सुरेश धस, अमरावतीचे प्रवीण पोटे-पाटील, वर्धा -चंद्रपूर -गडचिरोलीचे रामदास आंबटकर, नरेंद्र दराडे, विप्लव बाजोरिया हे २१ जून रोजी निवृत्त झाले आहेत. दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

## ड्रग्ज रॅकेट 'टास्क फोर्स'

ड्रग्ज रॅकेटप्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'टास्क फोर्स' निर्माण करून संपूर्ण देशभरातील ड्रग्ज माफियांचे हे रॅकेट उध्वस्त करावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली. देशाच्या केंद्रीय यंत्रणा ज्यापध्दतीन काम करतात त्यापलीकडे जाऊन ही 'टास्क फोर्स' यंत्रणा तयार करून तरुण पिढी उध्वस्त करणाऱ्या या ड्रग्ज रॅकेट माफियांवर कारवाई व्हायला हवी असं स्पष्ट मतही उमेश पाटील यांनी व्यक्त केलं. पुण्यात ड्रग्जमुळे तरुणपिढी बरबाद होण्याच्या मार्गावर असल्याने हे रॅकेट पुण्यापर्यंत मर्यादित नाही, तर ते आंतरराष्ट्रीय रॅकेट आहे, असंही उमेश पाटील म्हणाले.

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती

राजर्षी शाहू महाराज यांची १५०वी जयंती आज साजरी होत आहे. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचं आणि मोफत केलं. त्यांचा जन्म दिवस 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शाहू महाराज यांना समाजमाध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. विधान भवनातील शाहू महाराजांच्या पुतळयास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर महानगरपालिका, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, समाज कल्याण विभाग आणि नागपूर महावितरण या संस्थांमध्ये देखील राजर्षी शाहू महाराज यांची १५०वी जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. शाहू महाराज यांचा जन्मदिवस 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त कोल्हापूर मध्ये शोभा यात्रा आणि समता दिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं.

## स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान

एसटी महामंडळाने घेतलेल्या "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत 'अ' वर्गामध्ये राज्यात जळगावं जिल्ह्यातील चोपडा बसस्थानकाचा प्रथम क्रमांक आला असून, या बसस्थानकाला रू.५० लाखाच बक्षीस मिळाले आहे. या अभियानांतर्गत 'ब' वर्गामध्ये भंडारा जिल्ह्यातील साकोली बसस्थानकाचा राज्यात पहिला क्रमांक आला असून, या बसस्थानकाला रू.२५ लाखाचे बक्षीस मिळाले आहे. तसेच 'क' वर्गामध्ये सातारा जिल्ह्यातील मेढा बसस्थानकाचा प्रथम क्रमांक आला असून, या बसस्थानकाला रू.१० लाखाच बक्षीस मिळाले आहे. मुख्यमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून १ मे,२०२३ ते ३० एप्रिल,२०२४ या काळात एसटी महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान" राबविलं गेलं. लोकसहभागातून बसस्थानकाचा विकास या संकल्पनेवर आधारित राबविण्यात आलेल्या या अभियानामध्ये स्थानिक लोकांच्या सहकार्यातून बसस्थानक आणि बसस्थानक परिसराचे सुशोभिकरण, आकर्षक रंगरंगोटी, मोकळया जागेमध्ये

बागबगीचा, वृक्षरोपण, प्रवाशांसाठी बसस्थानकांवर वॉटरकुलर, घड्याळ, सेल्फीपॉईंट, ही कामे करण्यात आली. या बरोबरच प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा, बसेसच्या स्वच्छते बरोबरच त्यांची तांत्रिक दुरूस्ती ,देखभाल या सर्व घटकांचा विचार करून वर्षभरात वेगवेगळया सर्वेक्षण समितीच्या माध्यमातून बसस्थानकांचं मूल्यांकन करण्यात आलं. ही स्पर्धा राज्यभरातील ५६३ बसस्थानकांवर घेण्यात आली असून, या सर्व बसस्थानकांचे त्या बसस्थानकांवरील प्रवासी चढ-उताराच्या संख्येवरून अ, ब, क वर्गात वर्गीकरण केलं गेल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी अभिजीत भोसले यांनी दिली.

वीज रोधक यंत्र

अमरावती जिल्ह्यातील बडनेरा मतदारसंघातील नागरी वस्तीमध्ये वीज रोधक यंत्र बसवण्यात यावे अशी मागणी काँग्रेसचे पंकज मेश्राम यांनी केली आहे. या संदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रशासन आणि राज्याच्या मुख्य सचिवांना मेश्राम यांनी लेखी निवेदन दिलं आहे. अमरावती जिल्ह्यात गेल्या वर्षी वीज पडून 6 नागरिकांचा तर या वर्षी आत्तापर्यंत दोघांचा वीज पडून मृत्यू झाला आहे.

हवामान

आगामी 30 तारखेपर्यंत पूर्व विदर्भात बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. दरम्यान, आज विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज सकाळ पासून नागपुरात ऊन-सावलीचा खेळ सुरू आहे. अपेक्षानुसार पावसाने हजेरी लावली नसल्याने उकाड्यात मात्र प्रचंड वाढ झाली आहे. विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 38 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. आगामी काही तासात नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील काही ठिकाणी विजांच्या कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

एक पौधा एक विद्यार्थी

चंद्रपूर शहरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना वृक्ष लावणे आणि त्यांना जगविणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने का आवश्यक आहे याची जाणीव शालेय जीवनातच व्हावी या उद्देशानं "एक पौधा एक विद्यार्थी" ही स्पर्धा शालेय स्तरावर आणि शाळांसाठी "वृक्षमित्र विद्यालय" स्पर्धा येत्या १ जुलैपासुन चंद्रपूर महानगरपालीकेतर्फे राबविण्यात येणार असल्याची माहिती चंद्रपूर चे आयुक्त आणि प्रशासक विपीन पालीवाल यांनी शाळांसाठी आयोजित बैठकीत दिली. शहराचे ग्रीन झोन वाढविण्यास घेण्यात येणाऱ्या 'एक पौधा एक विद्यार्थी' स्पर्धेअंतर्गत विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करणे,वृक्षाचे संवर्धन आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार असुन स्पर्धेसाठी लागणारी आवश्यक ती झाडे मनपातर्फे पुरविण्यात येणार आहे.

*******